**म.सं.कौ.हि.का.अर्ज. क्र २७/२०२२**

**उर्मिला वि. पार्वताबाई**

**नि.क्र. ५८ सोबत**

**<u>सामनेवालेंतर्फे साक्षीदार क्रमांक २ सामनेवाला क्र. १ स्वतः याची जबानी शपथेवर सुरु</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव — पार्वताबाई शंकर दळवी

वय — ६५ वर्षे, व्यवसाय — काही नाही

रा. सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक

-------------------------------------------------

-------------------------------------------------

**सामनेवालेचा सरतपास सामनेवालातफे वकील श्री. एस. एम. नवले यांचे दवारा–**

२. मी दाखल केलेल्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर मला वाचून दाखवलेला असुन त्यातील मजकुर असून तो खरा व बरोबर आहे. सदर शपथपत्रावर माझा अंगठा आहे. सदर शपथपत्रातील मजकुर माझ्या म्हणण्याप्रमाणे आहे.

**सरतपास पुर्ण**

**साक्षीदाराचा उलटतपास अर्जदारातर्फे वकील श्री. एस. बी. घोरपडे यांचे दवारा–**

३. मला लिहिता वाचता येत नाही. आज जी कागदपत्रे दाखल केली ती मला वाचुन दाखवली तर मी त्यात लिहिलेले सांगु शकते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या विधिज्ञांनी स्वतःहुन पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर लिहून त्यावर माझा अंगठा घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, पुराव्याच्या शपथपत्रातील मजकुर माझ्या विधिज्ञांनी लिहिला असल्यामुळे माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये माझे वय ७५ व आत्ता मी सांगितलेले वय यांमध्ये तफावत आहे.

४. अर्जदार क्र. १ हि माझी सुन आहे व अर्जदार क्र. २ हा माझा नातु आहे. विवाहानंतर

अर्जदार क्र. १ व २ हे माझ्यासोबत आमच्या घरामध्ये राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा म्हणजेच अर्जदार क्र. १ हिचा पती मयत झाल्यावर आम्ही अर्जदार क्र. १ व २ यांना घरातुन हाकलून दिले. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. १ व २ यांना घरातुन हाकलून दिल्यामुळे अर्जदार क्र. १ हिने पोलीस स्टेशन येथे आमच्याविरुध्द फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार क्र. १ व २ हे आमच्या घरात राहू नये म्हणून आम्ही अर्जदार क्र. १ हिस त्रास देत होतो.

५. हे मला माहिती नाही की, अर्जदार क्र. २ हा सिन्नर येथील पवार शाळेमध्ये शिकतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व इतर सामनेवाले ज्या घरात राहतात ते घर माझ्या नावावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील माझ्या नावावरील घर हे आमच्या एकत्र कुटूंबाचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, विवाहानंतर अर्जदार क्र. १ हि तिच्या पतीसोबत माझ्या नावावर असलेल्या घरामध्ये एका खोलीमध्ये राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. २ हा बेपत्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. २ याची मुले व पत्नी हे माझ्यासोबत माझ्या नावावर असलेल्या घरामध्ये राहतात. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार क्र. १ व २ यांनी माझ्यासोबत माझ्या नावावर असलेल्या घरामध्ये राहू नये अशी माझी इच्छा आहे. माझा मुलगा आजारी असतांना त्याच्या आजारपणावर मी किती खर्च केला त्यासंबंधीची बिले मी अभिलेखावर दाखल केलेली नाहीत. आमची जमिन गहाण ठेवल्यासंबंधी मी न्यायालयामध्ये त्याबाबतचे दस्त दाखल करु शकते. आमच्या जमिनीसंबंधी साठेखत व गहाणखताचा दस्त हा मी करुन दिला होता. सदरील साठेखत व गहाणखत हे कोणत्या जमिनीसंदर्भात झाले व किती रक्कमेसाठी झाले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा आजारी

**म.सं.कौ.हि.का.अर्ज. क्र २७/२०२२**

**उर्मिला वि. पार्वताबाई**

**नि.क्र. ५८ सोबत**

असतांना किती रक्कम खर्च आला, हे मला सांगता येणार नाही. अर्जदार क्र. १ व २ माझ्या नावावरील असलेल्या घरातील ज्या एका खोलीमध्ये राहत होते, त्या खोलीमध्ये त्यांच्या आजही काही वस्तु आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी पुराव्याचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयामध्ये खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास – काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

दि. ०५/०७/२०२५.

RUSHIKESH RAMDAS JADHAV

Digitally signed by RUSHIKESH RAMDAS JADHAV
Date: 2025.07.09 11:21:55 +0530

(ऋ.रा.जाधव)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी

न्यायालय क्र. २, सिन्नर.

म.सं.कौ.हि.का.अर्ज. क्र २७/२०२२

उर्मिला वि. पार्वताबाई

नि.क्र. ५८ सोबत

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment/Deposition are same word to word as per the original Order/Judgment/Deposition.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Morankar |
| Court | : | 2nd Jt. Civil Judge J. D., Sinnar |
| Date | : | 05/07/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 05/07/2025 |
| Order Uploaded on | : | 09/07/2025 |